भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६७ /२०२६ दि. १८/०३/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, भिवंडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि.२१/०३/२०२६ रोजी किंवा एक दिवस मागे–पुढे चंद्र दर्शनाचे दिवशी मुस्लिम बांधवांचा **'रमजान ईद'** हा सण साजरा होणार आहे. सदर दिवशी मुस्लिम बांधव मोठया प्रमाणात पहाटे पासूनच नमाज पडणेसाठी वेगवेगळया मशिदीमध्ये मोठया संख्येने जमा होतात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

प्रवेश बंद – १) मुंबई/ठाणे/मानकोली कडून जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना **अंजुरफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने कारीवली जकात नाका रोडने विटभट्टी मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) मुंबई – ठाणे कडून जुना ठाणे आग्रा रोडने अंजुरफाटा कडून भिवंडी शहरात येणाऱ्या टी.एम.टी./के.डी.एम.टी./एस.टी., सर्व प्रकारच्या बसेस व हलक्या वाहनांना **नारपोली पो. स्टे.** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – टी.एम.टी./के.डी.एम.टी./एस.टी. मधील प्रवासी सदर ठिकाणी उतरतील व तेथूनच प्रवासी घेवून परत जातील व हलकी वाहने देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ३) रांजनोली चौकातून भिवंडी शहरात येणाऱ्या एस.टी./के.डी.एम.टी. बसेस, जड अवजड वाहने, कार, रिक्षा, दुचाकी वाहनांना **साईबाबा जकात नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर एस.टी./के.डी.एम.टी. बसेस, रिक्षा साईबाबा जकात नाका येथे प्रवासी उतरवतील व तेथूनच प्रवासी भरुन इच्छित स्थळी जातील व इतर वाहने साईबाबा जकात नाका येथूनच वळसा घेवून परत जातील.

प्रवेश बंद – ४) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **पारोळ फाटा (नदीनाका)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने अंबाडी नाका येथून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईनने इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ५) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व हलक्या वाहनांना **मेट्रो हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची हलकी वाहने मेट्रो हॉटेल येथून उजवे वळण घेवून संगमपाडा रोड–अजय नगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ६) वडपा चेकपोस्ट मार्गे वाडया कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **धामणगांव जांबोळी पाईपलाईन नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – **अ)** सदरची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवे वळण घेवून पाईपलाईन मार्गे वाडा कडे इच्छित स्थळी जातील.
ब) सर्व बसेस आपले प्रवासी सदर ठिकाणी उतरवतील व तेथूनच प्रवासी घेवून बस वळवून इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ७) छत्रपती शिवाजी महाराज चौक कडून वंजारपट्टी नाका मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने अजय नगर – संगमपाडा – मेट्रो हॉटेल येथून डावे वळण घेवून वंजारपट्टी ब्रिजवरुन इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **'रमजान ईद'** म्हणजेच **दि. २१/०३/२०२६ रोजी किंवा एक दिवस मागे–पुढे चंद्रदर्शनाचे दिवशी सकाळी ०५:०० ते १२:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम/ पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर
मा. आयुक्त, निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी,/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—२/वि.शा.ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस.कक्ष, ठाणे.
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग ठाणे.